दैनिक अन्यायाचा प्रतिकार महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनिल पोतदार

● वर्ष १६ वे ● अंक ७९ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.१२ जून २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी

जाहिरातीचे उत्तम माध्यम

या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.

Publish Your Public Notice, Tender Notice, Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'

For Booking....

Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706

Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434

Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# श्री. एकवीरा देवी मंदिर आणि राजगड किल्ला येथे लवकरच रोपवेची सुविधा

## पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे, राज्यमंत्री आदिती तटकरे यांच्या उपस्थितीत करारावर स्वाक्षऱ्या

**दै.रायगड नगरी । मुंबई**

पुणे जिल्ह्यातील श्री. एकवीरा देवी मंदिर येथे तसेच राजगड किल्ला येथे रोपवे मार्गाच्या निर्मितीसाठी आर्थिक आणि तांत्रिक सुसाध्यता अहवाल तयार करणे, निविदा व्यवस्थापन प्रक्रिया राबविणे यासाठी आज राज्याचे पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे आणि राज्यमंत्री कु. आदिती तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतीय पोर्ट रेल व रोपवे महामंडळ (आयपीआरसीएल) यांच्यासोबत पर्यटन संचालनालयाचा (डीओटी) सामंजस्य करार करण्यात आला. त्याचबरोबर राज्यातील कृषी पर्यटनाला चालना देण्यासाठी महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ (एमसीडीसी) यांच्यासमवेतही आज सामंजस्य करार करण्यात आला.

हे दोन्ही रोपवे प्रकल्प बांधा, वापरा, हस्तांतरित करा (बीओटी) तत्वावर बांधण्याचे प्रस्तावित आहे.



पर्यटन विभागाचा हा पथदर्शी प्रकल्प असेल. सह्याद्री अतिथीगृह येथे आज झालेल्या या कार्यक्रमास पर्यटन विभागाच्या प्रधान सचिव वल्सा नायर-सिंह, एमटीडीसीचे व्यवस्थापकीय संचालक आशुतोष सलील, पर्यटन संचालक डॉ. धनंजय सावळकर, भारतीय पोर्ट रेल व रोपवे महामंडळाचे संचालक अनिलकुमार गुप्ता, महाव्यवस्थापक जाकीर सिद्दीकी, सहकार विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद आकरे आदी मान्यवर उपस्थित होते.

मंत्री श्री. ठाकरे म्हणाले, आज करण्यात आलेले दोन्ही सामंजस्य करार राज्यातील पर्यटनाला प्रोत्साहन देणारे आहेत. एकविरा देवी मंदीर व राजगड किल्ला ही ठिकाणे राज्याची शक्तीपीठ व भक्तीपीठ आहेत. याठिकाणी रोपवे झाल्यास भाविक, पर्यटकांसाठी सुविधा निर्माण होणार आहे. आज झालेल्या करारानुसार भारतीय पोर्ट रेल व रोपवे महामंडळाने सर्व बाबींची एका वर्षात पुर्तता करुन पुढील वर्षी या दोन्ही ठिकाणी भूमीपूजन करण्याच्या दृष्टीने नियोजन करावे. राज्यमंत्री कु. आदिती तटकरे म्हणाल्या की, कोरोनामुळे दीड वर्षापासून प्रत्यक्षात पर्यटन बंद असले तरी भविष्यात राज्यातील पर्यटनाला चालना देण्याच्या अनुषंगाने विभागाने अनेक निर्णय घेतले आहेत. आज करण्यात आलेल्या दोन सामंजस्य करारांमुळे एकवीरा देवी मंदिर आणि राजगड किल्ला येथील पर्यटनाला तसेच राज्यात कृषी पर्यटनाला चालना मिळेल, असे त्यांनी सांगितले. आज झालेल्या दोन्ही सामंजस्य कराराची माहिती पर्यटन संचालक डॉ. धनंजय सावळकर यांनी दिली. ते म्हणाले की, एकविरा देवी मंदीर हे एक लोकप्रिय तीर्थक्षेत्र आहे. त्याच्या जवळच कार्ला लेणी हे पर्यटक आकर्षण आहे. एकविरा देवी



मंदिरात दरवर्षी ७ ते ८ लाख भाविक पर्यटक येतात. राजगड हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याची सुमारे २५ वर्षे राजधानी होती. त्यामुळे या किल्ल्याला ऐतिहासिक महत्त्व आहे. ट्रेकिंगसाठी हे लोकप्रिय ठिकाण आहे. रोपवेच्या विकासामुळे पर्यटकांसाठी सुविधा उपलब्ध होईल, अशी माहिती त्यांनी दिली.

## संक्षिप्त...

### मुंबईसह अनेक जिल्ह्यांना रेड अलर्ट

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबई : मुंबईत शुक्रवारी सकाळपासूनच मुसळधार पावसाला सुरुवात झाली आहे. सततच्या पावसामुळे शहरातील बऱ्याच भागात अनेक फुटांपर्यंत पाणी साचलं असून यामुळे वाहतुकीवर मोठा परिणाम झाल्याचं पाहायला मिळता आहे. नैऋत्य मॉन्सून मुंबईत दाखल होताच पुन्हा एकदा सगळीकडे पाणीच पाणी झालं आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, पुढील एक आठवडापर्यंत असाच पाऊस असेल. इतकंच नाहीतर पुढील ४ दिवस मुंबईसाठी रेड अलर्टही जारी करण्यात आला आहे. मुंबईव्यतिरिक्त ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यातील शेजारच्या जिल्ह्यांसाठीही रेड अलर्ट देण्यात आला आहे. आजही मुंबईत भरतीची भीती व्यक्त केली जात आहे.

खरंतर, दक्षिण-पश्चिम मान्सून वेळेपेक्षा दोन दिवस अगोदर मुंबईत दाखल झाला आहे. मुसळधार पावसामुळे अंधेरी पूर्वेतील सबवे महामार्गाला पूर आला असून वाहनांना ये-जा करण्यात अडचणी येत आहेत. मुंबईच्या सायन स्टेशनजवळ रस्तेही पाण्याखाली गेल्याचं चित्र आहे. मुंबई, नवी मुंबई, ठाणे, कल्याण, पालघर आणि अलिबागमध्ये पूर येण्याचा धोका आहे. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, आज कोकणातील सिंधुदुर्ग, रायगड, महाबळेश्वर आणि रत्नागिरीसह इतर भागातही मुसळधार पावसाचा अंदाज आहे. अरबी समुद्राच्या पूर्व-मध्य आणि उत्तरेकडील बाजूने आणि बंगालच्या उपसागरात कमी दाबाच्या क्षेत्र तयार झाल्यामुळे मुंबईत मुसळधार पाऊस सुरू आहे.

# स्थानिक प्रशासनाच्या हातात सुत देणे म्हणजे मोहम्मद तुघलकाचे राज्य

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोनाच्या हाणामारीत आणि हवामान खात्याच्या अंदाजानुसार सर्वाधिकार स्थानिक प्रशासनाला ठाकरे सरकार देवून मोहम्मद तुघलकाचे राज्य निर्माण केल्याचा आरोप रायगडमधील जनता करीत आहे.

मोहम्मद तुघलकाचे राज्य म्हणजे मनमानी करो कायदा अशा प्रकारचे होते. त्याचाच अनुभव आता पुन्हा रायगडवासियांना येवू लागला आहे. राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावाला नियंत्रण करण्यासाठी स्थानिक प्रशासनाला सर्वाधिकार बहाल केले. परंतु त्याचा सारासार विचार ठाकरे सरकारने केलेला दिसत नाही. म्हणूनच स्थानिक प्रशासन म्हणजेच जिल्हाधिकारी, आयुक्त, तहसीलदार, प्रांत, मुख्याधिकारी यांना बहाल केले आणि ते मनमानी राज्य करू लाग-लेले दिसत आहे. रायगडात मोठ्या प्रमाणात पर्जन्यवृष्टी आणि वादळ होण्याचे संकेत हवामान खात्याने दिल्यावर त्यावर नियंत्रण व्हावे म्हणून कोरोनाच्या काळात शनिवार, रविवार दोन दिवस कडकडीत लॉकडाऊन असताना गुरुवार आणि शुक्रवार हे दोन दिवस पर्जन्यवृष्टी आणि वादळ याचे निमित्त करून स्थानिक प्रशासनाने रायगडवासियांना वेठीस धरले. प्रत्यक्षात हवामान खात्याचा अंदाजही चुकला आणि रायगडमध्ये कोणत्याही प्रकारची अतिपर्जन्यवृष्टी तर झालीच नाही व वादळाचा किरकोळ प्रकार वगळता संपूर्ण रायगड जिल्हा हा हवामान खात्याच्या अंदाजाविरुद्ध गेलेला दिसत आहे. परंतु स्थानिक प्रशासनाने जनतेला वेठीस धरुन गुरुवार आणि शुक्रवार दोन दिवस कडकडीत बंद पाळण्याचा फतवा काढला. त्याचबरोबर शनिवार, रविवार देखील कडकडीत बंद असल्यामुळे सामान्य नागरिकांचे हातावर कमाविणाऱ्या कुटुंबियांचे मोठ्या प्रमाणात हाल झालेले दिसत आहेत. म्हणून हा प्रकार मोहम्मद तुघलकांचे राज्य असल्याचा आरोप रायगडवासियांमधून केला जात आहे. म्हणून यापुढे कोणताही निर्णय घेताना शासनाने (ठाकरे सरकारने) स्थानिक प्रशासनावर कोणतीही जबाबदारी देवू नये.

# पनवेल गुन्हे शाखेकडून १४ सोनसाखळी चोरीचे गुन्हे उघडकीस ; सराईत गुन्हेगार गजाआड



**दै.रायगड नगरी । पनवेल**

मागील सहा महिन्यापासून पनवेल परिसरात घडलेल्या ३० सोनसाखळी चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यास पनवेल गुन्हे शाखा कक्ष २ ला यश आले आहे.

पोलीस आयुक्त नवीमुंबई बी.के.सिंग, अप्पर पोलीस आयुक्त गुन्हे डॉ.बी.जे. शेखर पाटील, पोलीस उपायुक्त गुन्हे प्रवीण पाटील यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालया मध्ये घडलेल्या सोनसाखळी चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत व अभिलेखा वरील जामिनावर सुटलेले गुन्हेगारांच्या हालचालीवर लक्ष देण्याबाबत आदेशित केले होते. त्या अनुषंगाने सहा.पो. आयुक्त गुन्हे विनोद चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष २चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे यांच्या नेतृत्वाखाली हे सोनसाखळी चोरीच्या गुन्ह्यांचा समांतर तपास करीत असताना गुन्हा ..../२

# धरणात विष टाकून मासे मारले ; पाली भूतीवली भागात प्रचंड दुर्गंधी पसरली

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील पाली भूतीवली धरणातील मासे मारण्यासाठी विषप्रयोग केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. त्यामुळे धरण तीरावर मृत माशांचा खच पडला असून परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली आहे.

गतवर्षी २०२० मध्ये पाऊस कमी झाल्याने पाली भूतीवली धरण ओव्हर फ्लो झाले नव्हते. परिणामी धरणात सोडण्यात आलेले मासे मोठे झाले असून काही माशांचा आकार २० किलोहुन अधिक मोठा झाला असल्याचे जाणकार सांगतात. धरणातील हजारो मासे मारुन त्यांची विक्री करण्याच्या उद्देशाने पाण्यात विष टाकल्याचा धक्कादायक प्रकार केला गेला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागांतर्गत कर्जत तालुक्यात पाली भूतीवली येथे लघु पाटबंधारे योजनेतून बांधण्यात आलेल्या धरणात हा प्रकार घडला आहे. सदर या जलाशयात कोणालाही उतरण्यास, मासेमारी तसेच परिसरात प्रवेश करण्यास बंदी आहे. असे असतानाही अशा



प्रकारची कामे धरण परिसरात सर्रासपणे होत आहे.

याच धरणातील जलाशयात छुप्या पद्धतीने मासेमारी होत होती. परंतु मासे मारण्यासाठी विषारी पदार्थाचा वापर येथे केला जात असल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. धरण परिसरात फिरायला गेलेले शिवसेनेचे कर्जत उपतालुकाप्रमुख अंकुश दाभणे यांना धरणाच्या किनाऱ्यावर मोठ्या प्रमाणात मासे तरंगत असल्याचे ..../२

# नवघर उड्डाण पुलाच्या वळणावरील चिखलमय रस्त्यामुळे अपघाताची शक्यता?

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण पनवेल रस्त्यालगत फुंडे हायस्कुल जवळील नवघर उड्डाण पुलावर प्रवेश करते वेळी उरणला पाणीपुरवठा करण्यासाठी एमआयडीसीच्या पाईपलाईन साठी खोदण्यात आलेला रस्ता योग्यतेने दुरुस्त न करता त्यावर फक्त माती टाकण्याचे काम केल्याने नवघर उड्डाण पुलाच्या वळणावरील रस्ता चिखलमय झाला झाला आहे. त्यामुळे या रस्त्यावर अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

उरणला पाणी पुरवठा करणारी एमआयडीसी ची पाईप लाईन जीर्ण होत चालली असल्याने त्या नव्याने पाईपलाईन टाकण्याचे काम एका ठेकेदारामार्फत सुरू आहे. हे काम करत असताना पाईप टाकण्यासाठी अनेक ठिकाणी खोदकाम करण्यात आले आहे. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचा रस्ता खोदून पाईप



टाकली आहे. नवघर उड्डाण पुलाच्या वळणावर या रस्त्याचे खोदकाम करून पाईपलाईन टाकण्यात आली आहे. मात्र त्याठिकाणी वाहनांची वर्दळ सतत असतांनाही वाहतुकीचा विचार न करता वरचे वर मातीने मलमपट्टी करून बुंजण्यात आले आहे.

पाऊसाच्या दिवसात त्या ठिकाणी मोठमोठे खड्डे निर्माण होऊन रस्ता चिखलमय झाला आहे. तसेच या खड्ड्यामुळे चिखलाचा झालेला राडामुळे मोटारसायकल पडून अपघ-ताचा धोका निर्माण झाला आहे.मात्र आपघात झाल्यास जबाबदार कोण ? असाही सवाल विचारला जात आहे. तरी नवघर उड्डाण पुलाच्या वळणावर चिखलमय झालेल्या रस्त्यावरील खड्डे बुजून रस्ता वाहतुकीसाठी सुरळीत करण्यात यावा अशी मागणी करण्यात येत आहे.

**प्राईम लोकेशनला गाळा विकणे आहे**

पनवेल महानगरपालिका हद्दीत मिरची गल्लीत रोड टच डबल शटर (६५० बिल्टअप) एरीयाचा गाळा विक्री करणे आहे.

संपर्क : ९८२०३५५३४६

**ए.टी.एम.साठी जागा भाड्याने देणे आहे**

पवन अपार्टमेंट येथील लोखंडीपाडा, नवीन जिल्हा सत्र न्यायालयासमोरील जागा बँकेच्या ए.टी.एम.साठी जागा भाड्याने देणे आहे.

संपर्क : ९२२३३४५२४९


# माणगाव तालुक्यातील देवकुंड-पाटणूस धबधब्याच्या पर्यटन विकास आराखडा तयार करण्यास शासनाची मान्यता

## पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांचा आरोग्य यंत्रणेसह पर्यटन विकासाचाही ध्यास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेच्या बळकटीकरणाचा ध्यास घेतला आहे. त्याचप्रमाणे त्यांनी जिल्ह्यातील पर्यटन विकासाचाही ध्यास घेतला आहे. या दृष्टीने पर्यटनास वाव असणाऱ्या जिल्ह्यातील विविध प्रेक्षणीय स्थळांचा विकास करण्याचा दृष्टीने त्या सर्वतोपरी प्रयत्नशील आहेत. याकरिता त्या सतत शासनाकडे पाठपुरावा करीत आहेत.

त्यांच्या याच प्रयत्नातून माण-गाव तालुक्यातील देवकुंड-पाटणूस धबधब्याच्या पर्यटन विकास आराखडा



तयार करण्यास शासनाची नुकतीच मान्यता मिळाली आहे.

कुंडलिका नदीच्या तीन प्रवाहांचा इथे संगम होऊन जवळजवळ ८० फूटांवरून कोसळणारा देवकुंड धबधबा गोड्या पाण्याचा एक सुरेख तलाव निर्माण करतो. नदी, पर्वत आणि सोबतीला रमणीय जंगल असल्यामुळे निसर्गाच्या कुशीत उत्तम वेळ घालवण्यासाठी व ट्रेकिंग, कॅम्पिंगसाठी हे ठिकाण आदर्श असेच आहे.

देवकुंड धबधबा मुंबईपासून साध-ारण १७० कि.मी अंतरावर रायगड जिल्ह्यातील भिरा पाटणस नावाच्या गावात आहे. हे गाव ताम्हिणी घाटाजवळ आहे. वर्षभर इथे भेट देण्यास पर्यटकांची मोठी पसंती असली तरी पावसाळ्यात इथला निसर्ग विराट रूप ..../२

# जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्या पुढाकारातून शांतिवन कुष्ठरोग निवारण केंद्रातील नागरिकांचे लसीकरण



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी रायगड जिल्हयामधील सर्व वृध्दाश्रम, आदिवासी, अपंग, अंथरुणात असलेले रुग्ण, अशा सर्वांचे लसीकरण प्राधान्याने करण्याबाबत सर्व तहसिलदार, गट विकास अधिकारी, प्रकल्प अधिकारी आदिवासी विकास, मुख्याधिकारी नगरपरिषद यांना आदेशित केले होते.

त्यानुषंगाने जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्या उपस्थितीत नेरे येथील शांतिवन कुष्ठरोग निवारण केंद्रातील नागरिकांचे लसीकरण आज दि. ११ जून रोजी करण्यात आले. यावेळी प्रांताधिकारी दत्तात्रय नवले, तहसिलदार विजय तळेकर, आरोग्य यंत्रणेतील वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, शांतिवन कुष्ठरोग निवारण केंद्रातील प्रमुख कार्यवाह श्री.शिंदे, व्यवस्थापक व कर्मचारी आदि उपस्थित होते.

# परतीची आश्वासक वाट

'करोना'ची दुसरी लाट आटोक्यात येत असल्याची लक्षणे दिसत असल्याने महाराष्ट्र सरकारने नवी नियमावली जाहीर केली आहे. सरकारच्या या निर्णयाचे स्वागत करतानाच ही नवी नियमावली यशस्वी करण्याची जबाबदारी सर्वस्वी समाजावर म्हणजेच प्रत्येक नागरिकावर आहे, हे आवर्जून सांगणे आवश्यक आहे. गेल्या वेळी पहिली लाट ओसरल्यानंतर निर्बंध सैल झाले होते. त्यानंतर सर्वांनी जबाबदारीने वर्तन केले असते तर दुसऱ्या लाटेचा तडाखा इतका बसला नसता. तसेच, देशातील सर्वाधिक बळी जाणारे आणि सर्वाधिक रुग्णसंख्या असणारे राज्य म्हणून महाराष्ट्राची जी अपकीर्ती झाली, तीही कदाचित टळली नसती. झाले ते झाले. आता भविष्यात तिसरी लाट येण्याचीही शक्यता आहे. ती अगदी काही आठवडे किंवा महिन्यांच्या अंतरावरही दबा धरून बसली असू शकते. तिचा रोख लसीकरण न झालेल्या लहान मुलांवर असेल का, अशीही भयशंका आहे. अशावेळी, दुसऱ्या लाटेला निरोप देताना प्रशासनाने केलेली नियमावली कठोरपणे अमलात आणणे, वेळेच्या साऱ्या मर्यादा पाळणे आणि अस्थानी शौर्य न दाखविणे, आपल्याच हिताचे ठरणार आहे. करोना रुग्णांच्या संख्येनुसार राज्य सरकारने राज्याची विभागणी पाच गटांमध्ये केली आहे. हे अतिशय योग्य पाऊल आहे. हे विकेंद्रीकरण मागेच करायला हवे होते. पाचव्या म्हणजे सर्वाधिक रुग्णप्रमाण असणाऱ्या गटात केवळ कोल्हापूर हा एकच जिल्हा आज आहे. याचा अर्थ, एकंदरीत परिस्थिती आटोक्यात येते आहे. या आधीच्या चौथ्या गटातही रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि सांगली हे चारच जिल्हे आहेत. सुदैवाने, लोकसंख्येची घनता आणि प्रमाण अधिक असणारे मोठे जिल्हे अधिक सावरलेले आहेत. ते निर्बंधमुक्त काळातही तसेच राहती, अशी अपेक्षा आहे. राज्य सरकारने जिल्ह्यांबाबत जशी वर्गवारी केली आहे, तशीच वर्गवारी जिल्हाधिकाऱ्यांनी पुढे तालुका आणि गाव पातळीवरही करायला हवी. तसे केले तर तळागाळापर्यंत जबाबदारीची जाणीव पाझरेल तसेच करोना नियंत्रणात ठेवण्याचे नेमके प्रयत्न करणे सोपे जाईल. दुसऱ्या लाटेत, महाराष्ट्राचा ग्रामीण भाग अधिक तडाख्याखाली आला. त्यामुळेच, गाव पातळीवरचे प्रयत्न महत्त्वाचे आहेत. काही तरुण सरपंचांनी पुढाकार घेऊन अवघ्या काही आठवड्यांत गावातले सारे वातावरण बदलवून टाकले. या यशोगाथा 'महाराष्ट्र टाइम्स'ने प्रकाशित केल्या आहेत. आता निर्बंध सैल होत असले तरी हीच काटेकोर काळजी, निगराणी, चाचणी आणि रुग्णांवरील उपचार हे ढिले पडता कामा नये. नाहीतर, पुन्हा त्याची जबर किंमत मोजावी लागेल. अनेक शहरांमध्ये आता बस वाहतूक सुरू होते आहे. तसेच, एसटी प्रवासही सुरू होईल. मात्र, दोन कोटींहून अधिक लोकसंख्येसाठी जीवन वाहिनी असणारी महामुंबईला सेवा देणारी लोकलसेवा कधी पूर्ण सुरू होणार, हा कळीचा प्रश्न आहे. ती सुरू न होण्यात करोनाचा दोष कमी आणि इतकी वर्षे सार्वजनिक वाहतुकीचे जाळे विस्तृत न करणाऱ्या सरकारांचा दोष अधिक आहे. एरवीही लोकलने सुखाने प्रवास करता येत नाही. शारीरिक अंतर वगैरे संकल्पनांचा तर काही संबंधच नसतो. नेमक्या याच कारणांमुळे मुंबईतला करोना आटोक्यात येत असला तरी लोकलसेवा सुरू करण्याचा विचार पुढे गेलेला दिसतो. त्यातली अटळता समजावून घ्यायला हवी. राज्य सरकारने आता मनोरंजन विश्वालाही अधिक मोकळे करावे. तसे झाले तर महाराष्ट्रातले काही लाख प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार पुन्हा मिळतील. देशाचा अर्थकारणाचा घसरलेला गाडा शेवटी मुंबई व महाराष्ट्रालाच सावरून धरायचा आहे. तेव्हा मुंबई व महाराष्ट्र पूर्ण करोनामुक्त होऊन आर्थिक आघाडीवर लढण्यास सज्ज होणे, नितांत आवश्यक आहे. म्हणूनच, 'संपूर्ण काळजी घेऊनच पूर्ववत व्यवहार' हे सूत्र कोणी चुकूनही विसरता कामा नये. मुंबई किंवा इतरत्रही एकही नवा करोनारुग्ण सापडला नाही तरी 'मास्क' वापरण्याचा नियम काही काळ राहील. त्याची वैद्यकीय कारणे आहेत. तीही समजावून घ्यावी लागतील. काही दिवसांपूर्वी, प्राणवायू, काही औषधे आणि रुग्णशय्या मिळवणे, हा रुग्णांच्या नातलगांसाठी कसोटीचा प्रसंग होता. आज तशी स्थिती नाही. राज्यभरातला ताण सैलावला आहे. या स्थितीत खरे आव्हान आहे ते लसीकरणाला वेग देण्याचे. लसीकरण जितक्या लवकर पुरे होईल, तितका तिसऱ्या संभाव्य लाटेचा तडाखा निसटता बसेल. महाराष्ट्रातील निर्बंध सैल होत असताना नव्या आर्थिक वर्षाचे दोन महिने गेले आहेत. नवे शैक्षणिक वर्ष सुरू होते आहे. तसेच, शेतीचा नवा हंगामही हाक घालतो आहे. मान्सून येतो आहे. अनेक अर्थांनी हा नवा डाव मांडला जातो आहे. मात्र, तो कुणाच्याही बेशिस्त वागण्याने, अतिउत्साहाने आणि करोनाने दिलेले धडे बेपर्वाईने विसरून गेल्याने उधळला जाता कामा नये. ही परतीची आश्वासक वाट आहे. ती जोमाने पण करोनाला नवी संधी न देणाऱ्या संयमाने चालावी लागणार आहे.

# घरफोडी करणारा अट्टल आरोपी गुन्हे शाखा कक्ष २ कडून जेरबंद

**दै.रायगड नगरी । पनवेल**



कामोठे वसाहतीमध्ये घरफोडी केल्याप्रकरणी गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलने सराईत गुन्हेगाराला गजाआड केले आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील कामोठे पोलीस ठाणे हद्दीमध्ये सेक्टर १३, कामोठे येथील आर्ट वॉच व फुड मॅजिक या दोन दुकानाचे शटर उचकटुन दुकानातील घड्याळे व रोख रक्कम चोरून नेल्याने कामोठे पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सध्या कोरोना विषाणुच्या संसर्गामुळे कारागृहामध्ये होणारा संसर्ग टाळण्यासाठी मा न्यायालयाने जामिनावर मुक्त केलेल्या आरोपीच्या हालचालीवर लक्ष ठेवणेबाबत तसेच त्यांना वेळोवेळी चेक करणेबात पोलीस आयुक्त, बिपिनकुमार सिंह, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), डॉ.बी. जी .शेखर पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), प्रविण पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त ( गुन्हे), विनोद चव्हाण यांनी गुन्हे शाखेच्या सर्व शाखांना सूचना दिल्या होत्या. सदर गुन्हयांच्या समांतर तपासादरम्यान गुन्हे शाखा, कक्ष ०२, पनवेल येथिल वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि गणेश कराड, सपोनि प्रविण फडतरे, पोउपनि वैभव रोगे, पोउपनि मानसिंग पाटील व पथक यांनी सदरचा गुन्हा घडलेल्या ठिकाणी वेळोवेळी भेट देवुन सदर ठिकाणचे तसेच आजुबाजुचे सीसीटिव्ही फुटेज तपासुन सदरचा गुन्हा करणारा आरोपी हा नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अभिलेखावरील तसेच कोरोना विषाणु संसर्ग टाळण्याच्या धर्तीवर मा.न्यायालयाने मुक्त केलेला आरोपी नामे मिथुन मोजलीस सिकदर, वय २६ वर्षे, धंदा- भंगार बेचने रा . मोठा खांदा गाव, पनवेल, याने केल्याचे निष्पन्न झाले. सदर आरोपीस ताब्यात घेण्याच्या अनुषंगाने वेगवेगळी पथके तयार करून कामोठे, खांदेश्वर, पनवेल, खारघर परिसरामध्ये गुन्हा दाखल झाल्यापासुन सापळा लावुन त्यास खांदेश्वर सर्कस मैदान येथे ताब्यात घेतले. सदर आरोपीकडे सखोल तपास करून त्याचेकडुन गुन्ह्यातील गेलेला संपुर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. कोरोना विषाणुचा संसर्ग होत असल्याने कारागृहात होणारा संसर्ग टाळण्यासाठी मा न्यायालयाने सदर आरोपीस दि.१३/०५/२०२१ रोजी जामिनावर मुक्त करण्यात आले होते. तळोजा कारागृहातुन बाहेर आल्यानंतर नमुद आरोपीने सदरचा गुन्हा केलेला आहे. नमुद आरोपीवर यापुर्वी चोरी व घरफोडीचे एकुण ०७ गुन्हे दाखल आहेत. सदरच्या गुन्हयाच्या तपासादरम्यान सफौ.एस.पाटील, सफो एस.सांळुके, पोहवा पाटील, पोहवा पाटकर, पोहवा गडगे, पोहवा पवार, पोहवा कुदळे, पोना पाटील, पोना कानु, पोना मोरे, पोना फंदे, पोशि पाटील, यांनी उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे.

# भाजपा अध्यक्ष कैलास पायगुडे यांचा तडकाफडकी राजीनामा

**दै.रायगड नगरी । तळा**



तळा तालुका अध्यक्ष कैलास पायगुडे यांनी आपल्या अध्यक्ष पदाचा राजीनामा दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष ॲड. महेश मोहीते यांच्या कडे सुपूर्त केला आहे त्यांचा राजीनामा स्वीकारला की नाही हे अजुन कळलेले नाही. परंतु पायगुडे यांच्या राजिनामामुळे तळा तालुका भाजपाला हा जोरदार धक्का मानला जात आहे. अचानक दिलेल्या राजीनाम्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

तळा तालुक्यामध्ये पायगुडे यांच्याकडे नेतृत्व आल्यानंतर खरया अर्थाने भाजपाला अच्छे दिन आले, राष्ट्रवादी काँग्रेसच्या बाले किल्ल्यात रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्ये भारतीय जनता पार्टीने कैलास पायगुडे यांच्या नेतृत्वाखाली निवडणुक लढवली या निवडणुकीत राष्ट्रवादी आणि शिवसेना उमेदवारांच्या विरोधात भाजपाचे उमेदवार उभे करण्याचे धाडस पायगुडे यांनी केले.निवडणुकीत भाजपाचे उमेदवार पराभूत झाले असले तरी अपयश ही यशाची पहिली पायरी आहे असे समजुन पायगुडे यांनी हार मानली नाही, ग्रामपंचात निवडणुकीत गेली अनेक वर्षे गिरणे ग्रामपंचायतीवरील राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता एक हाती उलथवुन त्यांनी तळा तालुक्यात पहिल्यांदाच भाजपाची सत्ता आणली, अनेक ग्रामपंचायतीत त्यांनी भाजपाचे उमेदवार उभे केले, तर काही ग्रामपंचायतीत थेट उपसरपंच पदी भाजपाचे उमेवार निवडुन आणले. विरोधी पक्षनेते प्रविण दरेकर, आ.प्रशांत ठाकुर, आ.रविंद्र चव्हाण यांचे विश्वासू सहकारी म्हणुन त्यांनी छाप पाडली होती. तालुक्यातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, आधारभुत शासकीय भात खरेदी केंद्र, ही ठळक कामे त्यांच्या कारकीर्दीत पार पडली आहेत.

कैलास पायगुडे हे अजात शत्रु म्हणुन तळा तालुक्यात परिचित आहेत. त्यांच्या मनमिळाऊ स्वभावामुळे पक्षात इनकमिंग मोठ्या प्रमाणावर सुरु होते. प्रशासकीय ज्ञान आणि अधिकारी वर्गावर वचक असल्याने विकासकामे लवकरात लवकर ते मार्गी लावत असत. गिरणे ग्रामपंचायतीमध्ये त्यांनी करोडो रुपयांची विकासकामे मंजुर करुन यावर शिक्कामोर्तब केले आहे. पक्षाकडुन दिलेली जबाबदारी पार पाडत असताना त्याचप्रमाणे पक्षाला संजीवनी देत असताना अचानक त्यांनी राजिनामा दिला असल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

भारतीय जनता पार्टी तळा तालुक्यामध्ये आता पाय रोवते आहे पक्षांतर्गत गटबाजीमुळे जर पायगुडे यांना राजिनामा द्यावा लागला असेल तर ते पक्षाच्या पध्यावर पडणार असल्याचे बोलले जात आहे.एक चांगलं नेतृत्व पक्ष गमावुन बसेल अशी चर्चा सध्या रंगली असुन तळा नगरपंचायत निवडणुकीवर याचा परिणाम होणार आहे, तुर्तास कैलास पायगुडे यांचा राजिनामा स्वीकारणार की त्यांची नाराजी दुर करणार याकडे संपुर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# नैसर्गिक आपत्तींमुळे मच्छिमार आर्थिक संकटात

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

महाराष्ट्र सरकारने मच्छिमारांना मासेमारी करण्यासाठी १ ऑगस्ट २०२१ पासून अधिकृतरित्या परवानगी दिली असली तरी कोरोना,तोक्ते चक्रीवादळ व आता अतिवृष्टी व समुद्री वादळांच्या फटक्यांमुळे, गेल्या सिझन मध्ये मच्छीमार पुर्णपणे उद्ध्वस्त झालेला आहे. मच्छिमार आर्थिक संकटात सापडला आहे.

सरकारी उदासीनता तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे मच्छीमारी व्यवसाय धोक्यात आला असल्याचे मच्छिमारांचे म्हणणे आहे. गतवर्षीचे निसर्ग चक्रीवादळ,तोक्ते चक्रीवादळ, अवकाळी पावसाच्या नुकसानातून बाहेर निघत नाही, तोवर मच्छिमारांना कोरोनामुळे पुन्हा झालेल्या लॉकडाऊन मुळे अतोनात नुकसानाला सामोरे जावे लागले आहे. या मुळे मच्छीमारांवर आभाळ कोसळले आहे.

आता पुन्हा १ जून पासुन सागरी मच्छीमारीला दरवर्षी प्रणामे बंदी घालण्यात आली आहे. हि बंदी पावसाळी मासेमारीसाठी यांत्रिक छोट्या मोठ्या नौकांना लागू करण्यात आलीआहे. मात्र पारंपारिक पद्धतीने मासेमारी करणा-या बिगरयांत्रिक नोकांना ही बंदी लागु राहत नाही. तसेच राज्याच्या सागरी जल क्षेत्रात (सागरी किना-या पासुन १२ सागरी मैला पर्यंत)खोल समुद्रात मासेमारीसाठी जाणा-या नौकांना केंद्र शासनाने खोल समुद्रातील मासेमारी बाबत, धोरण, मार्गदर्शक,सुचना, आदेश लागू राहात असतात. राज्याच्या सागरी मासेमारी नौकांना पावसाळी मासेमारीसाठी बंदी ह्या कालावधीत मासेमारी करतांना आढळ्यास सदर मासेमारी नौकांना महाराष्ट्र सागरी मासेमारी अधिनियमन १९८१ कलम १४ अन्वये अश्या नौका पकडल्यास नौकेवरिल पकडलेली मासळी जप्त करण्यात येते व कलम १७ मधील तरदुदी अन्वये मच्छीमारांवर कारवाई केली जाते.



पृष्ठ क्र.१ वरुन...

## पनवेल गुन्हे शाखेकडून १४ सोनसाखळी चोरीचे गुन्हे उघडकीस

घडलेल्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, गुन्ह्यात वापरलेली वाहने, गुन्हा घडलेली वेळ व वार यांची माहिती संकलित करून तांत्रिक तपासा वरून ठाणे पोलिस आयुक्तालय अभिलेखा वरील सोनसाखळी चोरी मधील गुन्हेगार नामे फजल आयुब कुरेशी वय २५ वर्ष रा.ठी. रूम नंबर ४, टाटा पावर समोर, पठाण चाळ सूचक नाका कल्याण हा निष्पन्न झाला. सदर आरोपी हा त्याचेकडील चालु मोबाईल हा दिवसातुन काही वेळासाठी फक्त ४ ते ५ मिनिटासाठी चालु करीत असल्याने. सदर आरोपीस ताब्यात घेणेकामी मुंब्रा, भिवंडी, कल्याण, वर्तकनगर ठाणे येथे सपोनि प्रवीण फडतरे,गणेश कराड,पो उप निरी.मानसिंग पाटील, वैभव रोंगे यांची वेगवेगळी पथके पाठवुन सदर ठिकाणी सलग ०४ दिवस सापाळा लावुन नमुद आरोपीस ताब्यात घेतले. त्याचेकडे सखोल चौकशी केली असता नमूद आरोपीकडून खालील सोनसाखळी चोरीचे एकूण १२ गुन्ह्यासह १४ गुन्हे उघडकीस आणले आहेत. त्यामध्ये पनवेल शहर, कळंबोली, खारघर, एपीएमसी, ठाणे, नारपोली, कोन गाव, मानपाडा, भिवंडी, डोंबिवली, वागळे इस्टेट, टोकावडे, कोळसेवाडी आदी भागातील उघडकीस आल्या आहेत. सदर आरोपीचा शोध घेण्यासाठी सफौ.एस.पाटील, एस.साळुंके, पो.हवा. पाटील, पाटकर, गडगे, पवार, कुदळे, पो.ना.पाटील, कानू, मोरे, फंदे, पो.शि.पाटील यांनी उल्लेखनिय कामगिरी केली आहे.

नमूद आरोपी कडून गुन्हयातील जबरी चोरी केलेले दागिने व गुन्ह्यात वापरेलेल्या दोन स्कुटी मोटरसायकल हस्तगत करण्यात आल्या आहेत. सदरचा आरोपी हा २४ एप्रिल २०२१ रोजी कोरोना विषाणा प्रादुर्भाव रोखणेकामी मा. न्यायालयाने जामिनावर सोडल्यानंतर आधारवाडी कारागृह ठाणे येथुन बाहेर आल्यावर त्याने सलग एवढे गुन्हे केले आहेत. मागील सहा महिन्यापूर्वी ही गुन्हे शाखा कक्ष २ यांनी १६सोनसाखळी चोरीचे गुन्हे उघडकीस आणलेले होते सहा महिन्यात गुन्हे शाखा कक्ष २पनवेल यांनी सहा महिन्यात ३० सोनसाखळी चोरीचे गुन्हे उघडकीस आणल्याने त्यांचे सर्व स्तरावर कौतुक होत आहे.

## धरणात विष टाकून मासे मारले ; पाली भूतीवली भागात प्रचंड दुर्गंधी पसरली

दिसल्याने ही बाब समोर आली आहे.

अंकुश दाभणे यांना धरणाच्या किनार्यातवर मोठ्या प्रमाणात मासे तरंगत असताना दिसून आले होते, हे मासे मारण्यासाठी विषारी पदार्थ वापरण्यात आले असल्याने संबंधित प्रकार करणार्यांभवर कारवाई करण्याची मागणीदेखील त्यांनी यावेळी केली आहे. दुसरीकडे धरण परिसरातील अनेक गावांना पिण्याचा पाण्याच्या नळपाणी योजना या धरणातील पाण्यावर आहेत. त्या पाणी योजना विषारी पाण्यामुळे अडचणीत आल्या आहेत.

## विकास आराखडा तयार करण्यास शासनाची मान्यता

दाखवतो. भिरा गावातून साडेचार किलोमीटरचा ट्रेक आहे. देवकुंड धबधब्याचा ट्रेक तुलनेने सोपा आहे. गावात एक नोंदणी डेस्क आहे, जिथून मार्ग सुरु होतो. आपल्याला वाटाड्या हवा असल्यास तो इथे उपलब्ध होतो किंवा ठिकठिकाणी लावलेल्या फलकांच्या आधारे आपण स्वतःही जाऊ शकतो. वाटेत पाण्याचे ओढे आणि मोकळी शेतं पाहताना मन प्रसन्न होऊन जातं. जवळपास अर्ध्या तासात आपण भिरा तलावाजवळ पोहोचतो. पुढच्या ४५ मिनिटांत दोन ओढे ओलांडत थोड्याशा चढणीवरून जात एका खडकाळ मोकळ्या जागी पोहोचतो. इथे अल्पोपहार, ज्यूस आणि पाणी विकणाऱ्या छोट्या टपऱ्या आहेत. या ठिकाणी थांबून थोडी विश्रांती, आहार घेता येतो.

पुढे खडकाळ दगडांनी जाणारा आणखी एक किलोमीटरचा ट्रेक केला की, आपण धबधब्यावर पोहोचतो आणि खाली रोरावत कोसळणाऱ्या अप्रतिम धबधब्याचे दर्शन होते. उंचीवरून तलावात कोसळताना विविध रंगांचे खेळ करणाऱ्या धबधब्याचे दृश्य पाहण्यासारखे आहे. मित्रपरिवारासोबतच कुटुंबियांसोबतही हा ट्रेक अनुभवता येतो. वाढत्या पर्यटकांसोबतच अर्थात काही अंशी अपघातही होतात, त्यामुळे आता प्रशासनाने काही प्रमाणात निर्बंध आणले आहेत. लॉकडाऊन संपल्यावर जाण्याच्या ठिकाणांची यादी करत असाल, तर देवकुंड धबधब्याचा त्यात नक्की समावेश करावा.

माणगाव तालुक्यातील देवकुंड-पाटणूस धबधबा या पर्यटन स्थळाचा विकास होऊन या ठिकाणी अधिकाधिक संख्येने पर्यटक यावेत, यासाठी पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी व्यक्तिश: लक्ष घालून प्रयत्न केले. त्यांच्या या प्रयत्नांना यश आले असून देवकुंड-पाटणूस धबधब्याच्या पर्यटन विकास आराखड्यास अखेर शासनाची मान्यता मिळाली आहे.

# कळंबोलीतील पिण्याच्या पाण्याची समस्या आता सुटणार



**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली परिसरातील नागरिकांपर्यंत येणारे पिण्याचे पाणी हे दूषित येत असल्याच्या वारंवार तक्रारी सिडको दरबारी घेऊन वेळी उपोषणाचे हत्यार उपासणारे नगरसेवक रविंद्र भगत यांच्या पाठपुराव्याला आता यश मिळाले आहे. पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईनची झालेली दुरावस्था आणि त्यामुळे कळंबोलीकरांना दूषित पाण्याचा करावा लागणार सामना, आता शमणार आहे. नुकत्याच सिडको अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत नव्याने १२ इंची पाईप लाईन टाकण्याच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे.

कळंबोली परिसरातील सेक्टर १ ई ते ४ ई येथील पिण्याच्या पाण्याच्या जुन्या पाईप लाईन बदलण्याचे निर्णय आयोजित बैठकीत घेण्यात आले. यामध्ये कळंबोलीतील जुन्या पाण्याच्या पाईपलाईन काढून नवीन टाकण्यात आल्या, काही ठिकाणी पाण्याच्या लाईन बदलण्यात आल्या नव्हत्या, त्याठिकाणी मंजुरी देऊन G2 ची नवीन लाईन टाकण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. कळंबोली शहरातील नागरिकांना भेडसावत असणाऱ्या पाणी प्रश्नासंदर्भात सेक्टर १ ई या ठिकाणी १२ इंचाची नवीन पाईपलाईन जोडण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले.

कळंबोली शहरात पाण्याचे नवीन मीटर बसवण्यात आले आहेत. नवीन मीटर काही प्रमाणात खराब झाले आहेत. सिडकोच्या माध्यमातून ते दुरुस्त करुन नवीन मीटर बसवण्यात येण्यात यावे तसेच कळंबोली शहरातील सेक्टर १ ई ते ४ ई या ठिकाणी पुरेसा पाणी पुरवठा करण्याची कबुली आयोजित बैठकीत देण्यात आली तसेच पाण्याच्या दरवाढीसह इतर विषयांवर या बैठकीत चर्चा करुन मंजुर करण्यात आले. यावेळी बैठकीला सिडकोचे कळंबोली क्षेत्रातील पाणी पुरवठा अधिकारी अभियंता प्रशांत चहारे, अभियंता गणेश चंदनकर यांच्यासह शेतकरी कामगार पक्षाचे नगरसेवक रवींद्र अनंत भगत, कळंबोली महिला अध्यक्ष सरस्वती ताई काथारा, विजय भोईर आदींसह नागरिक उपस्थित होते.

# पनवेल एसटी आगार आणि रेल्वे स्थानकांवर आर.टी.पी.सी.आर. आणि रॅट चाचणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहराचा पॉझीटिव्हीटी दर कमी करण्यासाठी पनवेल महानगरपालिका क्षेत्रांमध्ये बाहेर गावावरुन प्रवास करून आलेल्या प्रवाश्यांची व संशयित व्यक्तींची आरटी पीसीआर आणि रॅट चाचणी करणे बंधनकारक आहे असे निर्देश महापालिका आयुक्त सुधाकर देशमुख यांनी दिलेले आहत. या अनुषंगाने बाहेर गावावरून येणाऱ्या तसेच रोज ये-जा करणाऱ्या सर्व प्रवाश्यांची व संशयित व्यक्तींची पनवेल रेल्वेस्थानक तसेच पनवेल एस.टी महामंडळाच्या आगारांमध्ये प्रवाश्यांची आरटी पीसीआर आणि रॅट चाचणी करण्यात येत आहे.

याचबरोबर रहिवासी सोसोयट्यांमधील हाय रिस्क आणि लो रिस्क व्यक्ती, महानगरपालिका क्षेत्रांबाहेरून प्रवास करून आलेल्या प्रवासी गर्दीची ठिकाणे जसे की कळंबोली-मॅकडोनल्ड, तसेच दुकाने, भाजी मंडई, सार्वजनिक ठिकाणी गर्दी असणाऱ्या शासकीय,निमशासकीय, खाजगी कार्यालयातील कर्मचारी यांच्या देखील आरटी पीसीआर आणि रॅट चाचण्या करण्यात येत आहेत.

सोमवार दि.७ जूनपासून पनवेल कार्यक्षेत्रात ब्रेक द चेन अंतर्गत निर्बंध शिथिल करण्यात आले आहे. यानूसार अत्यावश्यक सेवे शिवायची दुकाने दुपारी चार वाजेपर्यंत सुरू ठेवण्यास परवानगी देण्यात आली आहे. या निर्णयानंतर पनवेल शहरात तसेच इतर नोडमध्ये देखील सर्वत्र नागरिकांची गर्दी दिसून येत आहे.

कोरेनाची रूग्णसंख्या कमी झाली असली तरी ती संपली नाही. कोरोनाचा आलेख उतरता ठेवायचा असेल तर वारंवार हात धुणे, सामाजिक अंतर पाळणे, मास्क वापरणे ही त्रिसूत्री नागरिकांना पाळणे आवश्यक आहे असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## महिलेच्या गळ्यातील सोन्याची चैन खेचली

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भाजीपाला खरेदी करताना ४७ वर्षीय महिलेच्या गळ्यातील सोन्याची चेन खेचून चोरटे पसार झाले आहेत. त्यांच्या विरोधात पनवेल शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घोट येथील बायमाबाई बाळाराम पाटील या घरासमोर भाजीपाल्याचे दुकान लावून भाजी विक्री करतात. दुकानासाठी लागणारा भाजीपाला ते पनवेल येथे खरेदी करत असताना एका स्कुटीवर बसलेल्या इसमाने त्यांच्या गळ्यातील सोन्याची चेन जोराने खेचली. व ते पळून गेले. ५४ हजार ४९० रुपये किमतीची सोन्याची चेन खेचून नेल्याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मांदाड प्राथमिक आरोग्य केंद्र नागरिकांच्या सेवेत

**दै.रायगड नगरी । तळा**

तालुक्यातील मौजे मांदाड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र लवकरच नागरिकांच्या सेवेसाठी खुले होणार असून आरोग्य केंद्रातील पदनिर्मिती प्रस्तावाला शासनाकडून मंजुरी देण्यात आली आहे.

मौजे मांदाड येथे सुसज्ञ व आवश्यक सर्व सुविधा युक्त अशी प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत बांधकाम करून उभी आहे. परंतु या ठिकाणी आरोग्य कर्मचारी, डॉक्टर यांचा तुटवडा भासत होता. या प्राथमिक आरोग्य केंद्रात एकूण पंधरा पदांना मान्यता देण्यात आली असून त्यात पाच नियमित पदे तर दहा काल्पनिक पदे मनुष्यबळ संख्येच्या प्रमाणात बाह्ययंत्रणेद्वारे (कुशल/अकुशल) घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. याठिकाणी वैद्यकीय सेवा उपलब्ध नसल्याने येथील नागरिकांना रुग्ण व्यक्तीला उपचारा साठी तालुक्याच्या ठिकाणी हलवावे लागत आहे. तसेच गरोदर महिलांना प्रसूती साठी रात्री अपरात्री हलवावे लागल्यास मोठी समस्या निर्माण होते. हे प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू झाल्यास येथील रुग्णांना स्थानिक पातळीवरच उपचार मिळणार आहेत.तसेच येथील नागरिकांची आरोग्याच्या बाबतीत होणारी गैरसोय दूर होईल. या प्राथमिक आरोग्य केंद्राचा लाभ मांदाड सह परिसरातील कुडे, रोवळा, वाशी, मजगांव खाजणी, काडणे, पिटसई, कासेवाडी, तारास्ते आदी गावांना होणार आहे. त्यामुळे समाधान व्यक्त केले जात आहे.

# चार महिने अतिवृष्टी सारखाच पाऊस बरसतो, तर चार महिने लॉकडाऊन करणार का?

## नागरिकांसह व्यापाऱ्यांचा संतप्त सवाल

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

संपूर्ण कोकण किनारपट्टी मध्ये पावसाळ्याच्या सीझनमध्ये अतिवृष्टी प्रमाणेच धो-धो पाऊस कोसळतो. काही ठिकाणी पावसाचे प्रमाण कमी जास्त असू शकते. आता प्रसार माध्यमे त्याचप्रमाणे सामाजिक माध्यमे व दळणवळण यंत्रणा यामुळे पावसाचे वर्तवलेले अंदाज सर्वसामान्य जनतेपर्यंत पोचतात. परंतू वीस ते पंचवीस वर्षापूर्वी फक्त रेडिओ शिवाय कोणतेही साधन नसल्यामुळे नागरिकांना हवामानाची माहिती फारशी मिळत नव्हती. परंतु फार जुन्या काळापासून कोकणामध्ये पाऊस भरपूर पडतो. हा पाऊस सुरुवातीचा असल्यामुळे जमीन मोठ्या प्रमाणात कोरडी झालेली असते. अशावेळी पाणी तुंबण्याचे प्रकार फार कमी प्रमाणात घडतात.



कारण पडलेले पावसाचे पाणी जमिनीमध्ये मोठ्या प्रमाणावर ती जिरत असते. जून महिन्याच्या सुरुवातीलाच मोसमी पावसाची सुरुवात होतानाच हवामान खात्याने अतिवृष्टीचा इशारा दिल्यानंतर जिल्हा प्रशासनाने दोन दिवसांचा कडक लॉकडाउन जाहीर केला. कोरोना महामारी मुळे अगोदरच लॉकडाउनच्या संकटात सापडलेल्या सर्वच नागरिकांना, व्यापाऱ्यांना त्याचप्रमाणे विविध ठिकाणी काम करणाऱ्या मजुरांना, पर्यटन व्यावसायिकांना मोठ्या प्रमाणात आर्थिक झळ सोसावी लागली होती. अनेकांच्या नोकऱ्या गेल्या आहेत. अनेकांचे व्यवसाय बंद पडलेले आहेत. अशा परिस्थितीत केवळ अतिवृष्टीचा इशारा दिल्यानंतर लॉकडाऊन जाहीर केला जात असेल तर कोकणात चार महिने धो-धो बरसणाऱ्या पावसामुळे चार महिने लॉकडाऊन जाहीर करणार का? असा संतप्त सवाल नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. आज सकाळी संपूर्ण बाजारपेठ पूर्णपणे बंद करण्यात आल्यामुळे नागरिकांना दूध देखील मिळू शकले नाही. त्यामुळे ज्यांच्या घरी लहान मुले आहेत, अशा नागरिकांचे मोठ्या प्रमाणावरती हाल झाले व त्यांच्यात चिंतेचे वातावरण असल्याचे पाहायला मिळाले.

फक्त औषधाची दुकाने, पॅथॉलॉजिकल लॅब, रुग्णालये, दवाखाने इत्यादी उघडे ठेवण्यात आले होते. औषधाची दुकाने उघडी असली तरी त्या ठिकाणी केवळ पावडरचे दूध मिळू शकते. जे दूध लहान मुले पितात ते दूध अशा दुकानांमध्ये उपलब्ध होत नाही. श्रीवर्धन तालुक्यात दहा तारखेला अजिबात पाऊस पडला नाही. अकरा तारखेला देखील दुपारनंतर तुरळक प्रमाणात पावसाला सुरुवात झाली.

तरीसुद्धा प्रशासनाने सकाळपासून संपूर्ण बाजारपेठ काटेकोरपणे बंद केली होती. अशा प्रकारचा काटेकोरपणा प्रशासनाने कोरोना काळात दाखवला असता तर कदाचित श्रीवर्धन मध्ये कोरोना रुग्णांची संख्या अत्यंत कमी असती. अशी प्रतिक्रिया सामान्य नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे. मागील काही दिवसांपासून श्रीवर्धन पोलिसांनी देखील शिवाजी चौकामध्ये अॅन्टीजेन टेस्ट सुरू केली होती. विनाकारण फिरणाऱ्या नागरिकांना पकडून त्यांची कोरोना चाचणी करण्यात येत होती. श्रीवर्धन शहरातील पाणी वाहून नेणारी गटारे देखील अद्याप कोरडी आहेत. त्यामध्ये देखील पाणी तुंबलेले पाहायला मिळत नाही. परंतु पाऊस न पडता सुद्धा श्रीवर्धन वासियांना कडक लॉकडाऊन सोसावा लागला. याबद्दल नागरिकांमधून प्रशासनाविरोधात नाराजी व्यक्त केली जात आहे.

## भक्ष्याच्या शोधात मानवी वस्तीत आलेल्या अजगराला जीवदान

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील कलंबूसरे गावात मानवी वस्तीत रत्नदीप नाईक यांच्या घराच्या पाठीमागे भक्ष्याच्या शोधात आलेल्या अजगराला वन्यजीव निसर्ग संरक्षण संस्थेच्या सदस्यांनी शिताफीने पकडुन इंद्रायणी डोंगर परिसरात सोडून जी-वदान दिले आहे. कलंबूसरे गाव हा डोंगर कुशीत वसलेला आहे. गाव सम्पल्या सम्पल्या जंगलाला सुरवात होते. जंगलात झालेल्या माती उत्खननामुळे जंगली प्राणी, पक्षी, साप, अजगर यांना जंगलात अन्न मिळत नसल्याने आपल्या अन्नच्या शोधात मानवी वस्तीत येऊ लागले आहेत.

असाच काल एक अजगर दुपारच्या वेळेस रत्नदीप नाईक यांना घराच्या पाठीमागे दिसला घाबरलेल्या अवस्थेत त्यांनी गावातील सर्पमित्र शिवप्रसाद भेंडे यांना फोन केला अजगर मोठा असल्याने त्यांनी त्याचे सहकारी संस्थेचे अध्यक्ष यांनाही लगेच बोलावून घेतले त्यांनीही क्षणाचा विलंब न लावता घटनास्थळी पोहचून त्या दोघांनी त्या अजगराला शिताफीने पकडले. याची खबर तात्काळ या विभागतले वनरक्षक संतोष इंगोले यांना देऊन त्या अजगराला इंद्रायणी डोंगर परिसरात सोडून जीवदान दिले आहे.



## शेतकऱ्यांची व शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सर्वोदय कृषी सेवा केंद्राच्या नावाने भात बियाणे श्रीमंत सीड्स या उत्पादकाच्या भात बियाणेच्या पिशवीत टाकून ते सीलबंद करून एका विशिष्ट कंपनीच्या नावाने विक्री करून शेतकरी आणि शासनाची फसवणूक करण्याच्या उद्देशाने साठा करून ठेवला होता. त्यामुळे परवानाधारक समीर वनगे आणि वैशाली वनवे यांच्याविरोधात शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्हा गुणवत्ता नियंत्रक निरीक्षक विजय तुपे सौंदर्य हे छापा टाकून तपासणी करतात. पनवेल येथील कृषी सेवा केंद्र तपासणीसाठी सर्वोदय कृषी सेवा केंद्र, मार्केट यार्ड, पनवेल यांच्या गोदामात त्यांना श्रीमंत सीडस या उत्पादन कंपनीच्या भात बियाणे छापील रिकाम्या पिशव्या दोन हजार पाचशे मिळून आल्या. यासोबत ५३० किलो सुटे भात बियाणे मिळून आले. यावेळी समीर वनगे आणि वैशाली वनवे यांनी परवाना सादर केला या परवान्यात श्रीमंत सीड्स या उत्पादक कंपनीचा समावेश असल्याचे दिसून आले. त्यामुळे श्रीमंत सीड्स या उत्पादकाच्या भात बियाणेच्या पिशवीत टाकून ते विशिष्ट कंपनीच्या नावे विक्री करून शेतकऱ्यांची आणि शासनाची फसवणूक करण्याच्या उद्देशाने वनगे आणि वनवे यांनी साठा करून ठेवला.

## शिवसेनेच्या प्रयत्नामुळे कळंबोली व कामोठे येथील जोड रस्त्याच्या कामाला सुरूवात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली येथून कामोठ्यात जाण्याकरिता मोठा वळसा घालून जावे लागत होते. यामुळे पादचाऱ्यांसह वाहन चालकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत होते. ही गोष्ट लक्षात येताच शिवसेनेच्या माध्यमातून याबाबत पाठपुरावा करून खा.श्रीरंग बारणे यांनी विशेष लक्ष घालून ही समस्या सोडविली आहे. व प्रत्यक्ष कामाला सुरूवात झाली आहे.



कळंबोलीमधून कामोठे येथे जाण्याकरिता शिवसेना शाखे वरून मोठा वळसा घालून जावे लागते त्यामुळे कामोठे व कळंबोलीतील रहिवाश्यांना मोठ्या प्रमाणात त्रासाला सामोरे जावे लागते. तसेच पेट्रोल व डिझेलचा सुद्धा मोठया प्रमाणात अपव्यय होत असून त्याचा नाहक भुर्दंड नागरिकांना सहन करावा लागत आहे. तसेच सध्या तेथून विरुद्ध दिशेने दुचाकीस्वार हे रस्ता क्रॉस करतात त्यामुळे त्या ठिकाणी छोटे-मोठे अपघात होतच असतात. तरी भविष्यात एखादी मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. या संदर्भात खासदार श्रीरंग बारणे यांनी लक्ष घालावे या करीता जिल्हा प्रमुख शिरीष घरत व महानगर प्रमुख रामदास शेवाळे यांच्या आदेशाने आणि पनवेल उप महानगर समन्वयन आत्माराम गावंड, कामोठे शहरप्रमुख राकेश गोवारी यांच्या मार्गदर्शनाने विभाग संघटक कळंबोली गिरीश धुमाळ, माजी शहरप्रमुख निलेश भगत, उपतालुका संघटक व महिला आघाडी सौ.टीया धुमाळ यांनी भेट घेऊन, तसेच चर्चा करून निवेदन सादर केले सदर निवेदनाची त्वरीत दखल घेऊन बारणे यांनी संबंधित बांधकाम खात्याला लेखी पत्र देऊन कळंबोली व कामोठे येथील नागरिकांना होणारा त्रास,दुर करण्यासाठी जोड़ रास्ता चालू करून देण्यात यावा, अशी मागणी केली. त्यानुसार प्रत्यक्ष कामाला सुरूवात झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.


# ग्रामपंचायत कोळखे

ता.पनवेल, जि.रायगड

## जाहीर निविदा

दि.११/०६/२०२१

प्रति,

अधिकृत / अनुभवी ठेकेदार,

यांस कळविण्यात येते की, ग्रामपंचायत कोळखे हद्दीतील ग्रामनिधी योजनेंतर्गत खालील विकासकामे करावयाची आहेत. त्याकरिता ग्रामपंचायत हद्दीतील अधिकृत/अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामांच्या कोऱ्या निविदा मिळण्याकरिता अर्जाची तारीख दि.१२/०६/२०२१ ते १७/०६/२०२१ पर्यंत या दिवशी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील.

सदर निविदा दि.१८/०६/२०२१ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील. सदर निविदा त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत ३ वाजेपर्यंत उघडण्यात येतील. कामांकरिता लागणारी इसारा रक्कम ग्रामपंचायत कोळखे यांच्या नावाने डिमांड ड्राफ्टच्या द्वारे / रोखीने स्वीकारण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे अगर नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. इसारा रक्कम अंतिम देयकातून कापून घेतली जाईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | इसारा रक्कम १% | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | कोळखे पेठ येथील रमेश सुरते यांच्या घरा जवळील बोअरवेल दुरुस्ती करणे व पारपुंड येथील बाबामिया कुरेशी यांच्या घराजवळील बोअरवेल दुरुस्ती करणे | ६०९३०/- | ६०९/- | १ महिना |

**अटी व शर्ती :-**

१) सर्वांत कमी दराचे अथवा कोणतेही टेंडर मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

२) सदर काम पंचायत समितीकडील बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करणेचे आहे त्याचे मूल्यांकनाप्रमाणे बील अदा करण्यात येईल.

३) काम ज्यांच्या नावे मंजूर होईल त्यांनी नियमा प्रमाणे रूपये १०० स्टॅम्प पेपरवर बॉण्ड करून देणे.

४) कामाचे एस्टीमेंट ऑफिस वेळेत पहावयास मिळेल.

५) दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास बिल अदा करणे अगर न करणे याचा अधिकार ग्रामपंचायतीस राहील.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत कोळखे**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत कोळखे**


## म्हसळा ग्रामीण रुग्णालयात फळ वाटप

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष राष्ट्रीय नेते शरदचंद्रजी पवार यांनी १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली.बघता बघता हा पक्ष महाराष्ट्रात फिनिक्स पक्षा प्रमाणे वाढला आणि राज्यात दोन वेळा सत्तेत आला. आज पक्ष स्थापनेला २२ वर्ष पूर्ण झाले. पक्षाच्या २२ व्या वर्धापन दिनानिमित्त म्हसळा ग्रामीण रुग्णालयात उपचार घेत असलेल्या कोरोना बाधित रुग्णांसाठी तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने फळ वाटप करण्यात आले. आयोजित केलेल्या या कार्यक्रमात तालुका अध्यक्ष समीर बनकर,सभापती छाया म्हात्रे,उपसभापती संदीप चाचले,गण अध्यक्ष अनिल बसवत,सतीश शिगवण,नाना सावंत,गजानन पाखड, आरोग्य अधिकारी डॉ.महेश मेहता आदी मान्यवर उपस्थित होते.ग्रामीण रुग्णालयात कोरोना बाधित रुग्ण असल्यामुळे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांच्या कडून नियमांचे योग्य रित्या पालन करण्यात आले, व प्रत्यक्ष रुग्णांना भेटून त्यांची विचारपूस करून धीर देण्यात आले.


**परीशिष्ट-१६**
**(उपविधीक क्र.३४ नुसार)**
**सदरहु संस्थेच्या भांडवल- मिळतीत मृत सदस्याच्या नावे असलेल्या भागभांडवल आणि हितसंबधाचे हस्तांतरण करणे बाबत हरकती- दावे संदर्भातील नोटीशीचा नमुदा**

## जाहिर नोटीस

श्री. खिमानंद जयदत्त पांडे हे आर्यन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित पत्ता भुखंड क्र. ५६, सेक्टर- २१, कामोठे, नवी मुंबई ४१०२०९ महाराष्ट्र ह्या सहकारी गृहनिर्माण संस्थेचे सदस्य होते त्यांच्या नावे सदनिका क्र.६०२ होती / आहे ते दिनांक १३.०८.२०२० रोजी कोणतेही नामर्निदेशन न करता मयत झाले.

सदरहू गृहनिर्माण संस्था, सदरहू मयताचे नावे सदरहू गृहनिर्माण संस्थेत असलेल्या भागभांडवल / आणि हितसंबधांचे हस्तांतरण करणेसंदर्भात वारस / वारसदार / इतर दावेदार / हरकतदार ह्यांचे दावे आणि हरकती ह्या नोटीसीद्वारे मागवित आहेत. तरी संबधितानी ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या सदरहु मयताच्या सदरहू गृहनिर्माण संस्थेतील भागभांडवल / हितसंबंधांच्या हस्तांतरणासंदर्भातील त्यांचे दावे / हरकती समर्थनार्थ कागदपत्रांच्या प्रती आणि इतर पुराव्यासह सदरहू गृहनिर्माण संस्थेच्या कार्यालयात सचिवांकडे सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यत जमा कराव्यात जर वर नमुद केलेल्या निर्धारित वेळेत दावे आणि हरकती सदरहु गृहनिर्माण संस्थेस प्राप्त झाल्या नाहीत तर सदरहू गृहनिर्माण संस्था, सदरहू संस्थेच्या उपविधितील तरतुदीनुसार सदरहु मयताच्या सदरहू संस्थेतील भागभांडवालाचे / हितसंबंधांचे व्यवहार करणेस मोकळे असतील सदरहू मयताच्या सदरहू गृहनिर्माण संस्थेतील भागभांडवल / हितसंबंधां बद्दल कोणत्याही हरकती / दावे सदरहू गृहनिर्माण संस्थेस प्राप्त झाल्या तर सदरहू गृहनिर्माण संस्थेच्या उपविधीनुसार त्यावर कार्यवाही केली जाईल. हरकतदार / दावेदार सदर नोंदणीकृत उपविधी, सदरहू गृहनिर्माण संस्थेच्या कार्यालयात संस्थेच्या सचिवांकडे जाऊन सकाळी १० ते सायंकाळी ५ ह्या वेळेत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ते नोटीशीत नमुद केलेल्या कालावधी दरम्यान तपासू शकतात.

स्थळ : नवीमुंबई
दिनांक : ११/०६/२०२१

**द्वारा/-**
**आर्यन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित**
**मा. सचिव**



मा.बहिर साहेब

अर्जदाराचे वकील श्री.विकास एस.पाटील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.८७३/२०२०
नि.नं.८/ड
ने.ता.२८/०७/२०२१

श्रीमती.फसुबाई नागा पाटील
वय : ५५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.वलप, पो.पडघे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै.माया अर्जन पाटील रा.वलप, ता.पनवेल, जि.रायगड हे दिनांक १९/०३/१९९९ रोजी मौजे : वलप, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले असून कै.माया अर्जन पाटील यांची पत्नी कै.आंबी माया पाटील ह्या दिनांक २५/०८/१९९७ रोजी मौजे : देवीचापाडा, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत. तसेच कै.माया अर्जन पाटील यांची आई कै.गोमुबाई अर्जन पाटील ह्या दि.१२/११/१९६५ रोजी मौजे : देवीचापाडा, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत. अर्जदार ह्या कै.माया अर्जन पाटील यांचे वारस असल्याबाबत खालील मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| तोंडरे | १०२ | - | ०-४२-० | ४.४४ |

वरील अर्जदार हे कै.माया अर्जन पाटील यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.माया अर्जन पाटील यांच्या वारस पत्रास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.९/६/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल
कोर्टाचा शिक्का
सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



मा.गोडसे साहेब यांचे कोर्टत

अर्जदारातर्फे वकील
श्री.विशाल अनंत मुंडकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर), पनवेल यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.२७/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.१९/०७/२०२१

श्रीमती.अंबीबाई कोल्हया चिमणे वगैरे ५ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जदार क्र.२ ते ५ यांची आई म्हणजेच अर्जदार क्र.१/१ यांची सासू व अर्जदार क्र.१/२ ते १/५ यांची आजी जानकीबाई काथोर चिमणे या दि.०३/०३/२०१२ रोजी मयत झाल्या आहेत. सदर मयत जानकीबाई काथोर चिमणे यांच्या व त्यांच्या इतर सामाईक मालकीच्या मौजे : पनवेल आणि कामोठे, ता.पनवेल येथील पुढीलप्रमाणे वर्णनाच्या जमीन मिळकती महाराष्ट्र शासनातर्फे सिडको लिमिटेड यांनी नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत केली आहे. सदर मिळकतींचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे :

**संपादीत मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पनवेल आणि कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| युनिट केस नं. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | सिडको फाईल नं. |
|---|---|---|---|---|
| कामोठे-३३ | २८८ | ८ | ०-११.१ | ५० |
| | २८८ | ११ | ०-१२.६ | |
| | ११ | १ | ०-०६.३ | |
| | ११ | ४ | ०-०६.० | |
| | २७७ | ६ | ०-०६.८ | |
| | २७७ | १५ | ०-०९.६ | |
| | २७० | ८ | ०-०१.३ | |
| | २५७ | ३/१ | ०-०६.१ | |
| | ३३३ | १ | ०-०३.६ | |
| | ३३४ | १ | ०-०५.० | |
| | ३३५ | ३ | ०-४३.३ | |
| | ३२७ | ७ | ०-१५.० | |
| | ३२८ | ९ | ०-२९.३ | |
| | ३२९ | ५ | ०-१९.० | |
| पनवेल-२५३/डी | ५४२ | ४ | ०-७७.९ | |
| | ६२४ | ५ | ०-६३.८ | |
| कामोठे-४१६/३५/बी | ३४५ | १ | ०-४२.० | |
| कामोठे-४१६/३५/सी | ३४६ | ११ | ०-०९.० | |
| कामोठे-३२ | ११ | २ | ०-०३.० | |
| | ११ | ६ | ०-०४.८ | |
| | २४० | १ | ०-१५.९ | |
| | २४८ | ३ | ०-०५.१ | |
| | २४८ | २१ | ०-१०.७ | |
| | २५६ | ३ | ०-०६.६ | |
| | २५७ | ३/२ | ०-१०.४ | |
| | २५७ | ५ | ०-०६.८ | |
| | २६२ | १४ (१) | ०-०६.६ | |
| | ३३५ | १ | ०-१८.७ | |
| | ३६२ | १ | ०-०५.० | |
| कामोठे-४८ | २७५ | १ | ०-२५.४ | |
| कामोठे-३५० | ३०० | ३ | ०-२४.३ | |
| | ३०३ | १० | ०-१५.७ | |
| | ३२१ | ४ | ०-३३.५ | |
| | ३२३ | १ | ०-२५.५ | |
| कामोठे-४१६/३५/ए | ३३९ | ९ | ०-१७.० | |

आता वर नमूद मिळकतींच्या संपादनापोटी मिळणारे भूखंड व इतर लाभ मयत जानकीबाई काथोर चिमणे यांच्या मृत्यूपश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणून सदर अर्जदार व त्यांचे इतर सहमालक यांस मिळणेकरिता अर्जदारांनी सिडको कार्यालयात चौकशी केली असता त्यांस सक्षम कोर्टातून मयतांचा वारस दाखला आणण्याकरिता सांगितले. सबब सदर अर्जदारांनी ते मयत जानकीबाई काथोर चिमणे यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.११ माहे जून सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल
कोर्टाचा शिक्का
सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, नाडसूरसाठी मौजे नाडसूर येथील शासकीय जागा हस्तांतरित

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

सुधागड-पाली तालुक्यातील प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, नाडसूर या इमारतीच्या बांधकामासाठी जमिनीची मागणी होती. याबाबत पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी व्यक्तिशः लक्ष घालून संबंधितांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते.

या पार्श्वभूमीवर मौजे नाडसूर, ता.सुधागड जि. रायगड येथील क्षेत्र ०.२०.० हे.आर. ही जमीन भोगाधिकार मूल्यरहित व महसूल मुक्त किंमतीने कब्जा हक्काने ही शासकीय जमीन जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, अलिबाग यांच्याकडे प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, नाडसूर करिता पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या निर्देशानुसार हस्तांतरीत करण्याचे आदेश जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी जारी केले आहेत. सुधागड-पाली तालुक्यातील ग्रामीण भागातील जनतेला आरोग्य सुविधा मिळण्याच्या दृष्टीने ही बाब महत्वाची आहे.

## रोठ खु. ग्रा. पंचायतीचे वतीने वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील रोठ खु.ग्रा.पंचायचीचे वतीने ता.१० रोजी ब्रुक्षारोपणाचा कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न करण्यात आला.

कोकणचे भाग्यविधाते तथा रायगड जिल्ह्याचे लोकप्रिय खा.सुनील तटकरे यांच्या आशिर्वादाने तसेच पालकमंत्री आदिती तटकरे व आ.अनिकेत तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संकल्पनेतुन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या २२ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधुन सदर ब्रुक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न करण्यात आला. तर कोकणासह रायगड जिल्ह्याची चक्रीवादळामुळे झालेली पर्यावरणाची हानी पाहता आणि कोरोना विषाणुसोबत सामना करत असताना भासत असलेला ऑक्सीजनचा तूटवडा पाहता आ.अनिकेत भाई तटकरे यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत आज दिनांक १० जून २०२१ रोजी रोठ खु. ग्रामपंचायतीने वतीने वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करून यशस्वीरीत्या संपन्न करण्यात आला. सदर कार्यक्रमाला सरपंच गीता मोरे, उपसरपंच महेंद्र कांबळे, सदस्य सचिन मोरे, जनार्दन मोरे, राकेश मोरे, हर्षाली कांबळे, मंगेश मोरे, अमोल ढमाळे, प्रकाश डाके आदींसह अन्य ग्रामस्थ उपस्थित होते. या कार्यक्रमातंर्गत ग्रा. पंचायत परिसरात विविध प्रकारच्या रोपांची लागवड करण्यात आली असून त्या सर्व रोपांची व्यवस्थितपणे निगा राखून संगोपन केले जाईल.

# ४५ वर्षांवरील नागरिकांनी आपले लसीकरण करून घ्यावे : सुधाकर देशमुख

## आजपर्यंत महापालिका कार्यक्षेत्रात १ लाख ६१ हजाराहून अधिक लसीकरण पूर्ण; रोज सरासरी ३९०० नागरिकांचे लसीकरण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महानगरपालिका क्षेत्रात सध्या ४५ वर्षावरील नागरिकांचे कोविड लसीकरण सुरू आहे. पनवेल कार्यक्षेत्रात १६ शासकीय केंद्रावर कोविशिल्ड लसींचा पहिला व दुसरा डोस दिला जात आहे. तर दोन शासकिय केंद्रावर को-वॅक्सीनचा दुसरा डोस दिला जात आहे. पनवेल कार्यक्षेत्रात अनेकदा लसीकरण केंद्रावर नागरिकांचा अल्प प्रतिसाद मिळत आहे. संभाव्य तिसऱ्या कोविडच्या लाटेच्या पार्श्वभूमीवर ४५ वर्षावरील नागरिकांचे जास्तीत जास्त लसीकरण करणे गरजेचे असल्याकारणाने नागरिकांनी आपल्या जवळच्या शासकीय लसीकरण केंद्रावर जाऊन मोफत कोविड लसीकरण करून घ्यावे.

कोरोनाची साखळी तोडण्यासाठी लसीकरण अत्यंत फलदायी ठरत आहे. मोठमोठ्या गृहसंकुलातील सोसायटी अध्यक्षांनी सोसायटीमधील ४५ वर्षावरील नागरिकांना लसीकरण करण्यासाठी आवाहन करावे. जेणे करून जास्तीत जास्त नागरिकांचे लसीकरण पुर्ण करण्याचे लक्ष पूर्ण होईल. नागरिकांसाठी लसीकरणाचे वेळापत्रक रोज प्रसिध्द होणाऱ्या प्रेस नोटमध्ये दिले जात आहे. ही प्रेस नोट Panvel Muncipal Corporation Covid १९ या महापालिकेच्या फेसबुक पेज तसेच टिव्टरवरती प्रसिध्द होत असते.





आजपर्यंत महापालिका कार्यक्षेत्रात १ लाख ६१ हजाराहून अधिक लसीकरण झाले आहे. रोज सरासरी ३९०० नागरिकांचे लसीकरण केले जात असून आजवर लसीकरणाची १२९० सत्रे झाली आहेत. दिनांक २१ जूननंतर १८ ते ४४ वयोगटातील नागरिकांचे लसीकरण सुरु होणार आहे. यानंतर लसीकरण केंद्रावरती गर्दी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सद्य परिस्थितीत ४५ वर्षावरील नागरिकांचे जास्तीत जास्त लसीकरण होणे गरजेचे आहे.

पनवेल कार्यक्षेत्रातील लसीकरण केंद्रावर रांगेत उभारण्याचा त्रास होऊ नये यासाठी ४५ वर्षावरील दिव्यांग बांधवांना प्राधान्य देऊन ४ नंतर 'विनाटोकन' लसीकरणाची सोय करण्यात आली आहे. तसेच जेष्ठ नागरिकांना देखील ४ नंतर 'विनाटोकन' लसीकरण केले जात आहे.

या सा-या सोयी सुविधांचा ४५ वर्षावरील नागरिकांनी लाभ घेऊन आपले लसीकरण पुर्ण करावे असे आवाहन वैद्यकिय आरोग्य विभागच्यावतीने करण्यात येत आहे.

> कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत ज्या व्यक्तींचे लसीकरण झालेले आहे अशा व्यक्ती कोरोनापासून दूर राहिल्या किंवा कोरोना झाला तरी त्यांना कमीतकमी लक्षणे आली. त्यामुळे कोरोनाचे लसीकरण हे अत्यंत फलदायी आहे हे सिद्ध झाले आहे. पनवेल महानगरपालिका क्षेत्रात सध्या ४५+ वयोगटातील व्यक्तिंच्या कोरोना लसीकरणाची मोहीम सुरू असून बहुतांशी लसीकरण केंद्रावर ठरवून दिलेल्या संख्येपेक्षा कमी नागरिकांकडून पहिल्या व दुसऱ्या डोसचा लाभ घेतला जात आहे. दिनांक २१ जून २०२१ पासून १८ ते ४४ वयोगटातील नागरिकांनाही लसीकरण मोहीम सुरू होणार आहे. त्यामुळे २१ जून २०२१ नंतर लसीकरण केंद्रावर फार मोठी गर्दी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे ४५+ वयोगटातील नागरिकांनी तात्काळ लसीकरण करून घ्यावे.
>
> **-सुधाकर देशमुख (आयुक्त, पनवेल महानगरपालिका.)**

# वयोवृध्दाला मारहाण करून जबरीने लुटणाऱ्या ३ गुन्हेगारांना उत्तर प्रदेश येथुन केले जेरबंद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका वयोवृद्ध इसमास मारहाण करून लुटणाऱ्या ३ गुन्हेगारांना गुन्हे शाखा कक्ष २ पनवेल यांनी उत्तर प्रदेश येथून जेरबंद केले आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील खांदेश्वर पोलीस ठाणे हद्दीतील अयप्पा मंदीर समोरील सेक्टर १३, नवीन पनवेल येथील जेष्ठ नागरीक बक शेखाजी दहातोंडे वय ८५ वर्षे, यांना ३ अनोळखी इसमांनी त्यांचे दुकानामध्ये जबरदस्तीने घुसुन त्यांना लोखंडी पाईपने डोक्यावर मारहाण करून जखमी करून त्यांचे गळ्यातील ४ तोळ्याची सोन्याची चेन जबरीने खेचुन तसेच त्यांचेकडील ताब्यातील खाम जबरी चोल नेली म्हणुन खांदेश्वर पोलीस ठाणे, गुन्हा नोंद होता. वयोवृद्ध इसमास त्यांचे सहते ठिकाणी रात्रीच्यावेळी घुसुन त्यांना अशाप्रकारे जबर मारहाण करून त्यांचे कडील सोन्याचे दागिने व पैसे जबरीने लुटुन नेणे या घटनेची संवेदशीलता पाहता सदरचा गंभिर गुन्हा उघडकीस आणण्याबाबत मा पोलीस आयुक्त बिपिनकुमार सिंह, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), डॉ.बी.जी.शेखर पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), प्रविण पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे), विनोद चव्हाण यांनी गुन्हे शाखेच्या सर्व शाखांना सूचना दिल्या होत्या. सदर गुन्हयांच्या समांतर तपासादरम्यान गुन्हे शाखा, पनवेल येथिल वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि गणेश कराड , सपोनि प्रविण फडतरे, पोउपनि वैभव रोंगे, पोउपनि मानसिंग पाटील व पथक यांनी सदरचा गुन्हा घडलेल्या ठिकाणी वेळोवेळी भेट देवुन सदर ठिकाणचे तसेच आजुबाजुचे सीसीटिव्ही फुटेज तपासुन तसेच बातमीदाराच्या मदतीने आरोपीने गुन्ह्यात वापरलेली ऑटो रिक्षा निष्पन्न केली असता सदरचे आरोपी हे गुन्हा केल्यानंतर राज्य - उत्तरप्रदेश येथे रेल्वेने पळुन गेल्याचे निष्पन्न झाले.

सदर आरोपीना अटक करण्याच्या अनुषंगाने राज्य - उत्तरप्रदेश येथील चौरी पोलीस ठाणे, भदोई यांचेशी संपर्क साधुन सदर गुन्हयातील आरोपींना ताब्यात घेण्यात आले. सदर ठिकाणी गुन्हे शाखा , कदार व खांदेश्वर पोलीस ठाणे यांचे संयुक्त पथक जिल्हा भदाई . राज्य - उत्तरप्रदेश येथे पाठवुन आरोपींना ताब्यात घेवुन सदर गुन्ह्यात खालील ३ आरोपीना अटक करण्यात आली. त्यामध्ये शहानवाज मोहमंद अस्लम शेख उर्फ शानू वय ३५ वर्षे, सेक्टर ४, आसूडगांव, सहमत अमरजीत अन्सारी वय २३ वर्षे , धंदा रिक्षा चालक सेक्टर ७. कामोठे, रोशनकुमार गटरू नट वय २१ वर्षे, धंदा वेल्डींगकाम / वॉचमन, आदईगांव , ता . पनवेल , जि , रायगड , सदर तिन्ही आरोपीकडे सखोल तपास करून गुन्ह्यातील जबरीने चोरलेला माल तसेच गुन्ह्यात वापरलेली ऑटो रिक्षा अशा एकुण २,५७,००० / - रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन, नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील वयोवृध्द इसमाला जबरीने मारहाण करून त्यांचेकडील सोन्याची चेन व पैसे लुटल्याचा सदरचा गंभिर गुन्हा कौशल्यपुर्ण रित्या उघडकीस आणला आहे. सदरच्या गुन्हयाच्या तपासामध्ये सफौ एस . सांळुके, पोहवा पाटील, पोहवा पाटकर, पोहवा गहलो, पोहवा पवार, पोहवा कुदळे, पोहवा तांडेल, पोना कानु, पोना मोरे, पोशि पाटील पोशि ढगे यांनी उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. नमूद अटक आरोपीकडून नवी मुंबई परिसरातील आणखी काही गुन्हे उघड होण्याची शक्यता आहे.

# राग मनात धरून मारहाण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली येथे बाहेर पार्क केलेली कार का काढली नाही याचा राग मनात धरून दोघांना चार इसमांनी हाताने व लाथाबुक्क्यांनी तसेच लाकडी दांडक्याच्या साहाय्याने मारहाण केल्याची घटना घडली आहे. तजमुल जागीर अन्सारी (वय-५२वर्षे), हैदर तजमुल अन्सारी (वय-२४वर्षे), अमन तजमुल अन्सारी (वय- १८वर्षे), ईरशाद तजमुल अन्सारी या आरोपींविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कळंबोली येथील प्रवीण राजन दुर्वळे यांनी मारुती स्विफ्ट डिझायर एम एच ०१ डिई ३५४२ ही गाडी सोसायटीच्या गेटवर रस्त्याच्या बाजूला पार्क करून ठेवली होती. यावेळी अमन अन्सारी (वय १८) हा घराच्या बाहेर आला व पार्क केलेली गाडी काढण्यास सांगू लागला त्यावेळी प्रवीण याने दहा मिनिटे थांब जेवण बनवत आहे असे सांगितले. काही वेळाने तरमूल अन्सारी (५२) हे घराच्या बाहेर येऊन त्यांनी शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. या वेळी त्यांना शिवीगाळ करू नका असे बोलले असता हैदर अन्सारी, तजमुल अन्सारी, हैदर अमन, इर्शाद यांनी हाताने आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच लाकडी दांडक्याच्या साह्याने मारहाण केली.

# दिवेआगर गावाची आठ दिवस सीमा बंद

**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगर गावच्या सीमा बंद करण्याचा निर्णय शनिवार (ता. ११) रोजी घेण्यात आला. कोरोना विषाणूचा संसर्ग पसरू नये म्हणून रविवार पासून पुढे आठ दिवस गाव बंदीचा निर्णय स्थानिक प्रशासनाच्या बैठकीत एकमताने पारित करण्यात आला.



तालुक्यातील दिवेआगर हे जगप्रसिद्ध पर्यटन स्थळ म्हणून प्रसिद्ध आहे. मागील चार दिवसात दिवेआगर गावातील कोविड पॉजिटीव्ह रुग्णांची वाढ होत आहे. व त्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याचा विचार करून स्थानिक प्रशासन ग्रामपंचायतसह पोलीस प्रशासन, महसूल विभाग, आरोग्य विभाग व दिवेआगर कोविड कमिटी यांच्या संयुक्त बैठकीत या रविवारी ( ता. १३) रोजी सकाळी ६ वाजल्यापासून ता. २० रोजी रात्री १२ वाजेपर्यंत आठ दिवस गाव सीमा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला.

कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी दिवेआगर ग्रामपंचायतीने कंबर कसली असून, गावात प्रवेश करणाऱ्या सर्व सीमा बंद करण्यात येणार आहेत. रविवार पासून आठदिवस अत्यावश्यीक सेवा, आपत्कालीन परिस्थिती सोडून विनाकारण गावात येणाऱ्या आणि बाहेर जाणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई व अँटीजन टेस्ट करण्यात येईल असा निर्णय बैठकीत घेतला आहे.

गावात प्रवेश करणाऱ्या प्रत्येक सीमेवरील तपासणी नाक्यायवर ग्रामपंचायत व कोविड कमिटी सदस्य, तसेच पोलिस तैनात राहणार असून, वाहनांची, तसेच बाहेरून येणाऱ्यांची कसून तपासणी करण्यात येणार आहे. कोरोनाच्या अनुषंगाने नियमांचा भंग करणाऱ्याविरोधात कडक कारवाई करण्यात येणार आहे. सद्यःस्थितीत दिवेआगर येथे कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी गावात अनेक उपाययोजना करण्यात येत आहेत. प्रत्येक नागरिकाने कोरोनाला हरवण्याचा निर्धार केला आहे.

दिवेआगर गावामध्ये ब्रेक द चेन मोहिमे अंतर्गत मागील दिवसात ग्रामपंचायतकडून संपूर्ण गावाचे सर्वेक्षण तसेच समुपदेश व जनजागृती करण्यात येत आहे. यामध्ये ऑक्सिजन लेव्हल, पल्स रेट तपासणी करूण्यास गावातील प्रत्येक कुटुंबाला भेट देण्यात येत आहे. मात्र, रुग्ण वाढ होत असून गावातील बाधित रुग्णांपासून गावात येणाऱ्या नागरिकांना याचा संसर्ग होऊ नये. गावच्या सीमा बंदीमुळे लवकरच कोरोना आटोक्यात येईल. पुढे आपलं गाव कोरोना मुक्त होईल यासाठी हा निर्णय घेण्यात आला. प्रत्येक घटकांनी कोरोना रोखण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन स्थानिक प्रशासनाकडून यावेळी करण्यात आले.

# वाकण पाली खोपोली राज्य महामार्गावर चिखलाचे साम्राज्य

## वाहतुकीला अडथळा, अपघाताचा धोका

**दै.रायगड नगरी । पाली/वाघोशी**

वाकण-पाली-खोपोली राज्य महामार्ग क्रमांक ५४८ (अ) च्या रुंदीकरणाचे काम अनेक महिन्यांपासून संथ गतीने सुरू आहे. पावसामुळे अर्धवट काम झालेल्या मार्गावर शुक्रवारी (ता.११) मोठ्या प्रमाणात चिखल व राडारोडा आला होता. परिणामी वाहतुकीला अडथळा येत असून चिखल व खड्ड्यांमुळे अपघाताचा धोका वाढला आहे.



पाली ते रासळ हा ३ किमीचा मार्ग तसेच तिवरे गावाजवळील मार्गावर, उंबरे गावाजवळ सध्या खूप दुरवस्था झाली आहे. इतरही काही ठिकाणी अशीच परिस्थिती आहे. मार्गावरील मोठाल्या खड्ड्यात वाहने आदळतात. शिवाय खड्डे वाचवितांना अपघाताचा धोका आहे. चिखलामुळे दुचाकीस्वार घसरत आहेत. या राज्य महामार्गाचे काम गेल्या ४ वर्षांपासून सुरू आहे. मात्र अजूनही ते पूर्ण झालेले नाही. लॉकडाऊनमूळे मजूर गावी गेले असल्याने काम संथ गतीने सुरु आहे. अपूर्ण व अर्धवट असलेले काम, काही ठिकाणी खराब झालेला मार्ग यामुळे प्रवासी, वाहनचालक व नागरिकांची प्रचंड गैरसोय होत असून संताप व्यक्त केला जात आहे.

मार्च महिन्यात या राज्य महामार्गाचे काम ५५ टक्के पूर्ण झाले होते. जून अखेर पर्यंत १०० टक्के काम पूर्ण होईल. आणि मे अखेर पर्यंत येथील संपूर्ण रस्त्याचे काम पूर्ण होईल आणि पाली, भालगुल व जांभुळपाडा या मोठ्या पुलांचे काम जून अखेर पर्यंत पूर्ण होईल. असे मार्च महिन्यात एमएसआरडीसीचे उपअभियंता सचिन निफाडे यांनी सकाळला सांगितले होते.

मात्र सध्या संथ व अपूर्णावस्थेतील कामामुळे पावसाळ्यात येथून प्रवास करणे जिकरीचे झाले आहे.

जवळपास २०० कोटी रूपये खर्चून राज्य महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम होत आहे. या रस्त्याचे काम पुर्वी मोनिका कन्स्ट्रक्शन कडे होते. मात्र त्यांचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याचे निदर्शनास आल्याने एमएसआरडीसी ने हे काम बिसीसी कन्स्ट्रक्शन कडे दिले होते. मात्र तरीही अर्धवट सुरू असलेले काम, रस्त्यावरील खड्डे आणि निकृष्ट दर्जाचे काम यामुळे आता हे काम वरह इन्फ्रा लिमिटेड कंपनीकडे सोपविण्यात आले आहे. या कंपनी अंतर्गत ६ सबकॉंट्रॅक्टर काम करत आहेत. मात्र अजूनही कामाला पाहिजे तेव्हढा वेग आलेला नाही.

# अतिकाळजी! बाजारपेठा बंद करुन पुन्हा गर्दीच ; व्यापारी संतप्त

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

अतिवृष्टीच्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात वैद्यकीय क्षेत्राशी निगडित सेवा वगळून सर्व दुकाने-आस्थापना दिनांक १० व ११ जून रोजी बंद ठेवण्याचे जिल्हा प्रशासनाचे आदेश जारी झाले आणि जुणे आदेशा प्रमाणे विकेंडला शनिवार, रविवारी पण बाजारपेठा बंद म्हणजे एकुण चार दिवस बंद होणार. परिणामी मोठ नुकसान कोणाचे होणार ? हा प्रश्नही जनतेमधुन विचारला जात आहे. तसच सगळ्याच बाजारपेठा बंद झाल्या का ? परंतु हे आदेश अचानक जारी झाल्याने जनते मधुन नाराजी व आश्चर्याचा सुर उमटला आहे. कारण नाशवंत मालाची आदल्यादिवशी झालेली खरेदी त्यामुळे या मालाचे विक्री अभावी पडुन नुकसान होणार. यामुळे हे व्यापारी चिंतेत पडले आहेत. नुकतेच लॉकडाउन मधुन जरासी सवलत मिळतेय तोच पुन्हा बंदचा आदेश ! एकतर गेले पावने दोन वर्षा पासून बाजारपेठा चालुबंदच्या खेळाने प्रत्येक वेळेस या बंद नंतर प्रचंड गर्दी होत असल्याचे अनुभवत असताना देखील प्रत्येक कारणास्तव बाजारपेठ बंद करुन नेमक काय साध्य करणार ? असा सवाल ऐरणीवर आला आहे.

कारण आपण या गर्दी कमी करणे व नियमांच्या अंमल बजावणीत खरच यशस्वी होतो का ? या प्रश्नाच्या उत्तरातच आपली ही अतिकाळजी योग्य कि अयोग्य याचे उत्तर दडले आहे. अस लोक बोलत आहेत. असे असंख्य पावसाळे यापूर्वीही गेले परंतु अतिवृष्टी होणार म्हणुन एका विशीष्ठ आस्थापना सोडुन बाकीच्यांनी घरातच बसा अस म्हणने, योग्य कि अयोग्य याचा विचार होणे, आजच्या घडीला महत्वाचे ठरणार आहे. कोणत्याही संकटाशी सामना करण्यासाठी आता लोकांना स्वावलंबी होऊ द्यात ! आपला रायगड जिल्हा साक्षर आहे. प्रत्येकाला प्रत्येकाची जबाबदारी कळते. जस कोरोनात माझे कुटुंब माझी जबाबदारी तसच ऐन पावसाळ्यात अतिवृष्टीत पण माझीच जबाबदारी आहे. कारण अतिवृष्टी झालीच तर अमुक एका आस्थापने साठी ती वेगळी नाही. मोठा पाऊस पडतो तेंव्हा लोकच बाहेर पडत ना- हीत, प्रत्येकाला काळजी आहे. आता खरच मिशन बिगीन अगेनचीच गरज आहे.

अजुनही कोरोनात शिक्षण ठप्प आहे मुलांची मानसिकता बदलत चालली आहे. अनेक विषय प्रशासनाचे अधिकारी वर्गा समोर आहेत. लोकांना सारखे हुकुम आदेशात ठेवणे आता परवडणारे नाही. कोरोना काळामुळे सतत संचारबंदी या एकमेव उपायामुळे झालेले नुकसान भरुन काढायला किती काळ लागेल ? हे आता कोणीही शासनकर्ता सांगु शकणार नाही. त्यामुळे हळुहळु लोकशाहीला गालबोट लागत आहे. प्रशासनाचे अतिकाळजीपोटी आता हुकुमशाहीचा अतिवापर होत एकंदरीत मानसिकता बदलाचे चित्र लोकांचे उद्रेकाला कारण ठरुन अराजकतेच्या धोक्याची घंटा वाजत आहे.

# कुडा लेणी पर्यटन विकास आराखडा तयार करण्यास शासनाची मान्यता

## पालकमंत्री अदितीताई तटकरे यांच्या प्रयत्नांना यश

**दै.रायगड नगरी । तळा**

राज्य शासनामार्फत विकसित करण्यात येणाऱ्या पर्यटनस्थळांचा खऱ्या अर्थाने विकास होण्यासाठी, पर्यटनास चालना देण्यासाठी तळा तालुक्यातील कुडा लेणी पर्यटन विकास आराखडा तयार करण्यास पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या प्रयत्नातून मान्यता मिळाली आहे.



कुडा ता.तळा येथे २६ कोरीव लेण्यांचा समूह कोरलेला आहे. या लेण्यांची नोंद इ.स.१८४८ मध्ये सापडली असून सहाव्या शतकात स्थापन करण्यात आलेल्या आहेत. लेणीतील २६ गुहांपैकी ४ चैत्यगृहे याठिकाणी आढळतात. भिक्षूंना राहण्यासाठी त्याकाळात व्यवस्था केली जात असल्याचे दिसून येते. भगवान गौतम बुध्दांच्या कोरीव प्रतिमादेखील यामध्ये आहेत. येथील लेण्यांचा विकास झाल्यास स्थानिकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. या प्राचीन बौध्द लेणींचा पर्यटनांत समावेश करून येथील विकास करण्यात येणार आहे.

तळा तालुक्यातील कुडा लेणी या पर्यटनस्थळाचा विकास होऊन या ठिकाणी अधिकाधिक संख्येने पर्यटक यावेत, यासाठी पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी व्यक्तिश: लक्ष घालून प्रयत्न केले. त्यांच्या या प्रयत्नांना यश आले असून कुडा लेणी पर्यटन विकास आराखडा तयार करण्यास अखेर शासनाची मान्यता मिळाली आहे.